# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 May 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ मे २०२५ दुपारी १.०० वा.

****

भारत–पाकिस्तानच्या अटारी सीमेवरून भारतासाठी आज एक आनंदाची बातमी आली आहे. पाकिस्ताननं भारतीय जवान पूर्णम कुमार साहू यांना भारताकडे सोपवलं. बीएसएफचे जवान पूर्णम कुमार २३ एप्रिलला चुकून पाकिस्तानच्या हद्दीत गेल्यानंतर पाकिस्ताननं त्यांना ताब्यात घेतलं होतं. अटारी सीमेवर पाकिस्ताननं त्यांना आज भारतीय अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केलं.

****

पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या नौमन इलाही याला पानीपत पोलिसांनी आज अटक केली आहे. पाकिस्तानातील एका दहशतवादी संघटनेला तो या ठिकाणाची माहिती पुरवत होता. तो मूळचा उत्तर प्रदेशातील कैराना येथील आहे. पाकिस्तानातील इक्बाल नावाच्या दहशतवाद्याच्या संपर्कात तो होता. बऱ्याच काळापासून त्याच्या बहिणीसोबत पानिपतमध्ये त्यानं वास्तव्य केलं होतं.

****

देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून भूषण गवई यांना राष्ट्रपती भवनात झालेल्या विशेष कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सकाळी शपथ दिली. या शपथग्रहण समारंभास पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपराष्ट्रपती जगदीश धनखर, लोकसभेचे सभापती ओमप्रकाश बिर्ला, गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. गवई यांच्या मातोश्री देखील या सोहळ्यास उपस्थित होत्या. न्यायमूर्ती भूषण गवई पुढचे ६ महिने १० दिवस या पदावर कार्यरत राहतील.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी डॉ. अजय कुमार यांची केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. कार्मिक आणि प्रशिक्षण विभागानं यासंदर्भातील आदेश जारी केला आहे. डॉ. कुमार यांनी यापूर्वी ऑगस्ट २०१९ ते ऑक्टोबर २०२२ पर्यंत संरक्षण सचिव म्हणून काम पाहिले होते.

****

अरुणाचल प्रदेशातील ठिकाणांची नावे बदलण्याचा चीनचा प्रयत्न हास्यास्पद आहे, असं भारताने म्हटले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले की, अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य आणि अविभाज्य भाग आहे आणि राहील. हे सत्य तेथील एखाद्या भागाचं नाव बदलण्याच्या हास्यास्पद प्रयत्नानं बदलू शकत नाही यावर त्यांनी भर दिला.

****

राज्यात देवस्थान इनाम जमिनी मोठ्या प्रमाणावर असून, या जमीनींच्या होत असलेल्या खरेदी विक्रीच्या व्यवहारांबाबत सरकार धोरण ठरवत असल्यामुळे या जमिनींची दस्त नोंदणी थांबवण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिले. मंत्रालयात यासंदर्भात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. देवस्थान इनाम मिळकतीच्या अनुषंगाने शासनस्तरावर धोरण ठरवण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगी खेरीज किंवा न्यायालयाचे आदेश असतील त्याशिवाय राज्यातील सर्व देवस्थानच्या खरेदी आणि विक्रीच्या व्यवहारांची नोंदणी केली जाऊ नये. जर व्यवहार झाले तर त्यास दुय्यम निबंधक यांना जबाबदार धरण्यात येईल असं बावनकुळे यांनी सांगितलं. सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी पश्चिम महाराष्ट्र देवस्थानच्या जमिनीबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर हा निर्णय घेण्यात आला.

****

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी आमदार प्रकाश सोळंके, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव सचिन कावळे, सहाय्यक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, विजय शिंदे यांच्यासह मंत्रालयातील अधिकारी कर्मचारी यांनीही छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केलं.

****

राज्यातल्या एकूण नऊ विभागामध्ये गेल्या मार्च महिन्यात ५ हजार १३० केंद्रांवर दहावीची परीक्षा पार पडली. यापैकी ३७ केंद्र कॉपी प्रकरणात दोषी आढळली असून, या केंद्रांवर कॉपीच्या एकूण ९३ घटना घडल्याची नोंद झाली तर सहा गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी आज दिली.
छत्रपती संभाजीनगर विभागात १३ केंद्रावर कॉपीच्या ३७ घटना, त्या पाठोपाठ नागपूर विभागात ७ केंद्रांवर २२ घटना, पुणे विभागात ७ केंद्रांवर १७ घटना, लातूर विभागात ७ केंद्रांवर १३ घटना आणि मुंबई विभागात ३ केंद्रावर ४ घटना घडल्या आहेत. कॉपीच्या बाबतीत कोल्हापूर, अमरावती, नाशिक आणि कोकण विभाग निरंक आहे. नागपूर विभागात २, नाशिक २, छत्रपती संभाजीनगर १ आणि अमरावती इथे १ गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या दोषी केंद्रांची मान्यता रद्द करण्याची प्रक्रिया लवकरच पूर्ण केली जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

****

बिहारमध्ये सुरू असलेल्या सातव्या खेलो इंडिया राष्ट्रीय युवा क्रीडा स्पर्धांचा उद्या समारोप होणार आहे. आज सकाळी महाराष्ट्राने एक सुवर्ण आणि एक रौप्य पदक जिंकले आणि आता ४७ सुवर्ण आणि ३९ रौप्य पदकांसह १२२ पदकं जिंकत पदकतालिकेत अव्वल स्थानावर आहे.

****